Vol 5 Issue 8 May 2016

ISSN No : 2249-894X

# Monthly Multidisciplinary Research Journal

# *Review Of Research Journal*

Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Welcome to Review Of Research

RNI MAHMUL/2011/38595 ISSN No.2249-894X

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## Regional Editor

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad.

## *Advisory Board*

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal
University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.ror.isrj.org**

ISSN: 2249-894X Impact Factor : 3.1402(UIF) Volume - 5 | Issue - 8 | May - 2016

Review Of Research





# महाराष्ट्रातील पाणलोटक्षेत्र विकास कार्यक्रमाचे चिकित्सक अध्ययन

एस.यु.अनपट
अर्थशास्त्र विभाग प्रमुख , सि.जे.पटेल महाविद्यालय तिरोडा, जि.गोंदिया .

## प्रस्तावना :

भारत कृषिप्रधान देश आहे. देशातील जवळपास 60 टक्के लोकसंख्या शेती व शेतीसंलग्नित व्यवसायावर अवलंबून आहे. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेत शेती क्षेत्राचे महत्व व योगदान नाकारता येत नाही.

शेती उत्पादनासाठी जमिनीबरोबरच पाणी या नैसर्गिक साधन संपत्तीची मुलभूत आवष्यकता असते. परंतु भारतीय शेतीची वस्तुस्थिती विचारात घेता 60 टक्के शेती कोरडवाहु म्हणजेच पावसाच्या पाण्यावर अवलंबुन आहे. त्यामुळे भारतीय शेती क्षेत्रात कोरडवाहु षेतीची समस्या उग्रं स्वरुप धारण करीत आहे या अनुषंगाने कोरडवाहु शेतीची समस्या सोडविण्यासाठी पाणलोट क्षेत्राचे व्यवस्थापन व विकास करणे तेवढेच महत्वाचे आहे.

महाराष्ट्राची अर्थव्यवस्था देखिल कृषीवर आधारीत आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत देखील शेतीक्षेत्राची भूमिका तेवढीच महत्वपूर्ण ठरते महाराष्ट्रात एकुण पिकाखाली क्षेत्राच्या केवळ 17 टक्के क्षेत्र सिंचनाखाली येते म्हणजेच 83 टक्के क्षेत्र कोरडवाहू आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील शेतक—यांच्या आर्थिक स्तर उंचावण्यासाठी शेतीचा विकास अग्रक्रमाने करणे अत्यंत आवश्यक आहे.

अर्थातच महाराष्ट्रात सिंचनाच्या सुविधा अत्यंत कमी, अवर्षण प्रवण क्षेत्राची, अवनत जमिनीची तसेच हलक्या जमिनीची मोठया प्रमाणात व्याप्ती वाढत असल्याचे निष्पन्न होते.

अर्थातच महाराष्ट्रातील शेती क्षेत्रासमोर अनेक प्रकारच्या समस्या आव्हाने आहेत त्यामध्ये प्रामुख्याने जलसिंचनाची कमतरता, अवर्षन प्रवन क्षेत्राचे वाढते प्रमाण, अवनत जमिनीचे व हलक्या जमिनीचे मोठे प्रमाण आदिंचा समावेश होतो त्यामुळे महाराष्ट्रातील शेतीचे उत्पादन व उत्पादकता अत्यंत कमी आहे. या अनुषंगाने विचार करता महाराट' राज्यात पाणलोट क्षेत्राचे व्यवस्थापन व विकास करणे अधिक महत्वाचे वाटते.

## पाणलोट क्षेत्र संकल्पना :

ज्या क्षेत्राचे पाणी नैसर्गिकरित्या वाहत येवुन एका नाल्याद्वारे एका ठिकाणाहून वाहते, त्या संपूर्ण क्षेत्रास पाणलोटक्षेत्र असे म्हणतात.

## पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन संकल्पना :

पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन म्हणजे त्या क्षेत्रातील उपलब्ध जमिन, पाणी, वनस्पती व इतर नैसर्गिक साधन संपत्तीचा योग्य रितीने

वापर करणे होय.

### पाणलोट क्षेत्र विकासाचे उद्दीष्टे :

1.पावसाचे पाणी अडवून जमिनीमध्ये जिरविणे, जेणेकरुन भूगर्भातील पाण्याची पातळी वाढविता येईल.
2.जमिन, पाणी, वनस्पती व इतर नैसर्गिक साधन संपत्तीचा योग्य रितीने वापर करणे व पर्यावरण समतोल राखणे.
3.पर्जन्याश्रयी शेतीचे अधिक शाश्वत व उत्पादनक्षम शेतीत रुपांतर करणे.
4.पडीक व अवनत जमिनी उत्पादनक्षम शेतीत रुपांतर करणे.
5.ग्रामिण भागातील पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न सोडविणे.
6.ग्रामिण भागातील बेरोजगारी कमी करुन गावातच रोजगाराची पुरेषी निर्मीती करणे.

यावरुन असे लक्षात येते की, पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमात त्या क्षेत्रातील उपलब्ध जमिन,पाणी, वनस्पती व इतर नैसर्गिक साधन संपत्तीचा योग्य वापर केला जातो याशिवाय पाणलोट क्षेत्रात उपलब्ध पर्जन्यमानाचा अधिकाधिक वापर होण्यासाठी जमिनिचे सपाटीकरण, बांधबंदीस्ती, समपातळीत नालाबांध, शेततळे, पाझर तलाव यासारखे कामे करण्यात येतात. यामुळे निष्चितच मृदसंधारण विकास व जलसंधारण विकास होण्यास हातभार लागेल.

महाराष्ट्रात पाणलोटक्षेत्र विकास कार्यक्रम राबवित असतांना या कार्यक्रमाच्या माध्यमातून प्रामुख्याने पुढील कार्यक्रम राबविण्यावर अधिक भर दिलेला आहे त्यामध्ये सलग समपातळीचर, समपातळी जैविक बांध, ढाळीचे बांध, मजगी, समतल मार्गदर्शक रेषा आखणी, लाईव्ह चेक डॅम,लुज बोल्डर स्ट्रक्चर, गॅबियन स्ट'क्चर, भूमिगत बंधारे, वळण बंधारे, माती नालाबांध, सिमेंट नालाबांध व शेततळे आदि स्वरुपातील मृदसंधारण व जलसंधारण अषा दोन्ही प्रकारची कामे केलेली आहेत. या कामावर महाराष्ट्र शासनाने जो खर्च केलेला आहे. त्या खर्चाचा तपशिल व विश्लेषन पुढील प्रमाणे केलेले आहे.

### महाराष्ट्रात राबविण्यात आलेल्या पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमावर विभानिहाय करण्यात आलेल्या खर्चाचा तपशिल पुढील प्रमाणे

| विभाग | 1999-2000 | 2000-2001 | 2001-2002 | 2002-2003 | 2003-2004 | 2004-2005 | 2005-2006 | 2006-2007 | 2007-2008 | 2008-2009 | विभागनिहाय एकूण झालेला खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कोकण विभाग | 2459.64 (11.17%) | 1775.64 (12.34%) | 1776.16 (7.76%) | 5109.04 (14.90%) | 4497.63 (6.54%) | 6722.6 (11.30%) | 6876.19 (15.50%) | 7775.04 (15.82%) | 15226.83 (22.36%) | 4987.63 (6.57%) | 57206.22 (12.38%) |
| नशिक विभाग | 1913.08 (8.69%) | 1918.53 (13.32%) | 3069.42 (12.37%) | 2138.96 (6.24%) | 4848.41 (7.05%) | 3456.69 (5.81%) | 5519.91 (12.44%) | 6941.56 (14.12%) | 2076.43 (3.05%) | 5598.05 (7.31%) | 37481.04 (8.22%) |
| पुणे विभाग | 1624.09 (7.38%) | 1257.85 (8.74%) | 4056.13 (16.35%) | 7501.59 (21.88%) | 22879.9 (33.25%) | 16019.32 (26.92%) | 8629.2 (19.45%) | 4527.14 (9.21%) | 6891.97 (10.12%) | 11204.93 (14.02%) | 84592.12 (18.31%) |
| कोल्हापूर विभाग | 1921.56 (8.73%) | 564.13 (3.92%) | 1129.76 (4.55%) | 2320.84 (6.77%) | 8244.67 (11.98%) | 5338.35 (8.97%) | 2897.34 (6.53%) | 3358.62 (6.83%) | 7052.88 (10.36%) | 8085.21 (10.54%) | 40913.36 (8.86%) |
| औरंगाबाद विभाग | 1167.23 (5.30%) | 1544.74 (10.73%) | 4078.77 (16.44%) | 4324.62 (12.61%) | 5936.1 (8.63%) | 6607.86 (11.11%) | 2923.58 (6.89%) | 3724.69 (7.58%) | 6371.67 (9.36%) | 6429.51 (8.39%) | 43108.77 (9.33%) |
| लातूर विभाग | 3924.83 (17.82%) | 3731.45 (25.92%) | 6809.67 (27.45%) | 7118.44 (22.22%) | 13414.57 (19.49%) | 13059.79 (21.95%) | 7301.05 (16.49%) | 7124.59 (14.60%) | 11714.46 (17.21%) | 11152.82 (14.54%) | 85351.61 (18.47%) |
| अमरावती विभाग | 1230.69 (5.59%) | 1190.4 (8.27%) | 2830.32 (8.57%) | 2695.74 (7.86%) | 5002.22 (7.27%) | 3721.02 (6.25%) | 4416.36 (9.96%) | 8864.62 (18.04%) | 13137.2 (19.29%) | 18583.54 (24.25%) | 60972.51 (13.20%) |
| नागपूर विभाग | 2035.86 (9.25%) | 1102.07 (7.66%) | 1175.53 (4.74%) | 2132 (6.22%) | 3889.34 (5.65%) | 2862.82 (4.81%) | 4812.32 (11.85%) | 3951.06 (8.04%) | 4541.2 (6.67) | 8441.07 (11.01) | 34943.27 (7.56%) |
| इतर विभाग / योजना | 5740.75 (26.07%) | 1309.64 (19.10%) | 581.46 (24.35%) | 444.37 (1.30%) | 97.12 (14.00%) | 1691.52 (2.84%) | 974.96 (2.19%) | 2877.91 (5.86%) | 1072.45 (1.58%) | 2179.09 (2.83%) | 16969.27 (3.67%) |
| महाराट^राज्य | 22017.73 (100.00%) | 14394.45 (100.00%) | 24807.22 (100.00%) | 34285.96 (100.00%) | 68809.9 (100.00%) | 59499.43 (100.00%) | 44350.91 (100.00%) | 49144.63 (100.00%) | 68085.09 (100.00%) | 76621.85 (100.00%) | 462017.17 (100.00%) |

स्त्रोत : मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन कृषि आयुक्तालय कार्यालय, पुणे
टिप : कंसातील आकडे हे एकूणाशी प्रतिशत दर्शवितात.

वरील तक्त्यावरुन असे दिसुन येते की, महाराष्ट्र शासनाने पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम राज्यात विभाग निहाय राबविलेला आहे सन 1999–2000 ते 2008–2009 या कालखंडाचा विचार करता असे स्पष्ट होते की, लातुर विभागात 85351.61 लक्ष रुपये एवढा खर्च करण्यात आला हा एकून विभागाचा तुलनेत सर्वाधिक खर्च आहे. तो दहा वर्षामध्ये एकूण खर्चाच्या 18.47 प्रतिशत एवढा आहे त्यानंतर पुणे विभागाचा 18.31 प्रतिशत एवढा आहे. उरवरीत विभागाचा विचार करता तो जवळपास न्युनतम पातळीवर 8 ते 9 प्रतिशत एवढा आहे यावरुन असे लक्षात येते की, पुणे व लातुर विभागात पाणलोटक्षेत्र विकासाची कामे सर्वाधिक झालेली आहे. मात्र विदर्भाचा विचार करता नागपूर विभागात दहा वर्षामध्ये एकूण खर्चाच्या केवळ 7.56 प्रतिशत एवढा खर्च करण्यात आलेला आहे तो इतर विभागाच्या तुलनेत सर्वात कमी खर्च आहे यावरुन असे लक्षात येते की, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा व कोकण विभागाच्या तुलनेत विदर्भात पाणलोट क्षेत्र विकासाच्या कामावरील खर्च कमी झालेला आहे मात्र वस्तुस्थिती अशी आहे की, महाराष्ट्रात पाणलोट क्षेत्र विकास कामे करण्यासाठीची व्याप्ती व वाव विदर्भात मोठया प्रमाणात असतांना देखिल ती कमी प्रमाणात झाल्याचे या उरोक्त आकडेवारीच्या अभ्यासा अंती दिसून येते याचे महत्वाचे कारण शोधले

असता असे लक्षात येते की, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा व कोकण विभागाच्या तुलनेत विदर्भात राजकीय नेतृत्वाचा आभाव असल्याचे स्पष्ठ होते.

महाराष्ट्रात राबविण्यात आलेल्या पाणलोटक्षेत्र विकास कार्यक्रमावर करण्यात आलेल्या खर्चाचे वर्ष निहाय अवलोकन करता असे लक्षात येते की, लातुर विभ्रग व पूणे विभागाला अधिक वाटा मिळालेला आहे त्यामध्ये 2003 – 2004 या वर्षामध्ये महाराष्ट्रात एकुण करण्यात आलेल्या खर्चाच्या 33.25 प्रतिशत एवढा वाटा पूणे विभागाला मिळाल्याचे दिसून येते तर 2001 – 2002 या वर्षाचा विचार करता महाराष्ट्रात या वर्षात एकूण करण्यात आलेल्या खर्चाच्या 27.45 प्रतिशत एवढा लातूर विभागाला मिळालेला होता यावरुन असे लक्षात येते की, वर्षनिहाय करण्यात आलेल्या खर्चाचा विचार करता पूणे विभाग व लातूर विभागालाच सर्वाधिक वाटा मिळालेला आहे तर सर्वात कमी वाटा नागपूर विभागाला मिळालेला आहे तर इतर विभागाचा विचार करता जवळपास न्युनतम पातळीवर सारखाच वाटा दिल्याचे दिसून येते

## *निष्कर्ष व शिफारसी :*

### *निष्कर्ष :–*

1.महाराष्ट्रात पाणलोटक्षेत्र विकास कार्यक्रमाची परीणाम कारकता तपासतांना असे लक्षात आले की, या कार्यक्रमामुळे निश्चितच जमिनीची धूप कमी झाली, भूगर्भातील पाणीसाठा वाढला, पडीक व अवनत जमिनीचा विकास, ग्रामिण भागातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न काही प्रमाणात सुटला आहे. तसेच रोजगारात वाढ पीक रचनेत बदल शेती उत्पादन वाढीत चालना आदी स्वरुपात फायदे झाल्याचे अभ्यासाअंती सिघ्द होते.

2.महाराष्ट्रातील पाणलोटक्षेत्र विकास कार्यक्रमाची परिणामकारकता तपासतांना असेही लक्षात आले की, हा कार्यक्रम पुणे विभाग व लातूर विभागात मोठया प्रमाणात राबविलेला आहे मात्र तुलनेत विदर्भाकडे दुर्लक्ष झाल्याचे दिसून आले

3.महाराष्ट्र शासनाने पाणलोटक्षेत्र विकास कार्यक्रम राबवितांना निधिच्या तरतुदित व केलेल्या कामात आणि उपचार पध्दतीत सातत्याचा अभाव असल्याचे सांख्यिकीय आकडेवारी वरुण दिसून येते

### *शिफारसी :–*

1.महाराष्ट्रात विभागनिहाय विचार करता, विदर्भ विभागात पाणलोटक्षेत्र विकास कार्यक्रम राबविण्यासाठी मोठी व्याप्ती आहे म्हणून हा कार्यक्रम मोठया प्रमाणात राबविण्यासाठी महाराष्ट्र शासनाने योजनावध्द पध्दतीने पुढाकार घेणे अधिक महत्वाचे वाटते

2.महाराष्ट्राची अर्थव्यवस्था कृर्षीवर आधारीत आहे, कृषी उत्पादन प्रक्रीयेत जमिनिप्रमानेच पाणी हा घटक अत्यंत महत्वाचा आहे त्यामुळे शासनाने शेती विकासाच्या दृष्टीने केवळ शेती अनुदाने, पॅकेजेस देवुन शेतीचे प्रश्न सुटनार नाहीत तर शेतीसाठी लागणा–या पाण्याच्या बाबतीत कायमस्वरुपी सुधारणा  म्हणून पाणलोटक्षेत्र विकास कार्यक्रम अधिक प्रभाविपने राबविणे अधिक गरजेचे आहे

3.महाराष्ट्र शासनाने अर्थसंकल्पात पाणलोटक्षेत्र विकासासाठी भरीव निधीची तरतुद करुन ती सातत्यपूर्ण खर्च करण्यात यावी

### *सदर्भ :–*

1.पाणलोट क्षेत्र विकास मार्गदर्षिका – जलसंधारण व कृषी विभाग महाराष्ट्र शासन
2.पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन तांत्रिंक मार्गदर्षिका कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
3.कोरडवाहू शेती – मोरे दे, कृ, मोहिते बा. सी, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मीती मंडळ, नागपूर
4.कोरडवाहू शेती समस्या व उपाययोजना जुलै 2011
5. जलव्यवस्थापन – काळाची गरज संदर्भ – महाराष्ट्र राज्य प्रा. डॉ. शालिनी पांडे रिसर्च लिंक – 90 व्हालूम 10 1 सप्टेबर 2015
6.मृद संधारण व पाणलोटक्षेत्र व्यवस्थापन कृषी आयुक्तालय, महाराष्ट्^ राज्य, पुणे यांच्या कार्यालयातील दस्तऐवज व सांख्यिकीय विवरणपत्रे.



*एस.यु.अनपट*
*अर्थशास्त्र विभाग प्रमुख , सि.जे.पटेल महाविद्यालय तिरोडा, जि.गोंदिया .*

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- Directory Of Research Journal Indexing
- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.ror.isrj.org